# फळशास्त्र विभाग
## उद्यानविद्या विद्याशाखा
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

क्र.वि.प्र./फ.शा./कंत्राटीकामे/२१४/२०२४ दि. १४/०६/२०२४

**दर पत्रक सुचना**

प्रती,

..............................

..............................

..............................

**विषय: फळ रोपवाटिका व प्रक्षेत्रा वरील विविध कामे बाह्यस्त्रोतातून करार पद्धतीने करणे बाबतचे दर सादर करणे बाबत.**

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, या विभागा अंतर्गत येत असलेल्या फळ रोपवाटिका तसेच प्रक्षेत्रा वरील विविध कामे करार पद्धतीने बह्यास्त्रतातून करावयाची आहेत. तरी कृपया सोबत दिलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून खालील विविध प्रकारची कामे करण्या करिता दरपत्रके या कार्यालयास विहित मुदतीत सादर करण्याचे करावेत.

| अ. क्र. | कामाचे विवरण | सादर करावयाचा दर |
|---|---|---|
| | **रोपवाटीकेतील कामे** | |
| १ | तणनाशक, कीडनाशक, सुष्मअन्नद्रव्य ई. ची फवारणी करणे | प्रती पंप |
| २ | बियाणे लागवड करणे | १ x ६ मी. आकाराचा प्रति बेड प्रमाणे |
| ३ | पिशवी मध्ये बियाणे, आंबा कोई ई. लागवड करणे | प्रती शेकडा |
| ४ | जम्बेरी, रंगपूर, लिंबू (संत्रावर्गीय) ई. रोपे प्लॅस्टिक क्रेट्स मधुन काढून पिशवी मध्ये लागवड करणे (मध्यमाचा उपयोग करून) | प्रती शेकडा |
| ५ | खराब झालेल्या पिशव्या, मातीने भरलेल्या पिशव्या जमा करणे व फाडून त्या मधील माती वेगळी करणे. | प्रती शेकडा |
| ६ | संत्रावर्गीय तसेच चिकू, मोसंबी, सीताफळ, आंबा, ई. कलमांची फुट काढणे. | प्रती कलम |
| ७ | रोपवाटिका व सभोवतालील परीसरा मधील निंदन काम करणे (पिशव्या मधील तसेच बेड वरील गावत काढणे ई.) | प्रती हेक्टर |
| ८ | प्लॅस्टिक क्रेट्स (३५ x २५ x १० से.मी. आकाराच्या) मधील निंदन करणे | प्रती क्रेट्स |
| ९ | पिशव्यांची एका ठिकाणा वरून दुसऱ्या ठिकाणी उचल करणे, पिशव्या गाडी मध्ये भरून देणे (Loading) व खाली उतरविणे (Unloading) | प्रती शेकडा |

| | | |
|---|---|---|
| | **प्रक्षेत्रावरील कामे** | |
| १० | प्रक्षेत्रावरील (६ वर्षा वरील वयाची) झाडांना बोर्डो पेस्ट लावणे | प्रती झाड |
| ११ | मातृवृक्षांचे आळे (एक मीटर क्षेत्र) निंदन करणे. | प्रती झाड |
| १२ | प्रक्षेत्रावरील निंदन करणे (रबी मध्ये) | प्रती हे. |
| १३ | प्रक्षेत्रावरील निंदन करणे (खरीप मध्ये) | प्रती हे. |
| १४ | संत्रा, मोसंबी, आंबा ई. फळ झाडांची लागवड करिता बेडवर खड्डा (२ x २ x २ फु.) करणे, कलमांची लागवड करणे, तसेच खड्डा शेणखत / रासायानिक खत ई. द्वारे भरणे. | खड्डा करणे, भरणे व कलम लागवड करणे या नुसार दर प्रती झाड |
| १५ | फळ पिकांचे मातृवृक्षांचे आळे तयार करणे, टाचन खत देणे (एक मीटर सभोवताली) | प्रती झाड आळे |
| १६ | तीन वर्षा पर्यंतच्या झाडाची फुट काढणे. | प्रती झाड |
| १७. | मातृवृक्षाच्या खोडावरील जमिनी लगत ची फुट काढणे | प्रती झाड |
| १८. | काशा, धसकटे, कचरा वेचणे | प्रती हेक्टर |
| १९. | प्रक्षेत्रावर ब्रश कटरच्या माध्यमातून तण व्यवस्थापन करणे (संपूर्ण साहित्य उदा. मशीन, पेट्रोल, ऑईल ई. सह) | प्रती एकर |
| २०. | फळांची तोडणी करणे (संत्रावर्गीय व ईतर फळ पिके) | प्रती क्रेट्स (१५-२० कि.) |

**टिप:** सर्व दर पत्रके दि. २७/०६/२०२४ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयास सादर करावेत. सर्व दर पत्रके हे निम्नस्वाक्षरी करिता यांच्या नावे खालील कार्यालयीन पत्त्यावर विहित मुदतीच्या आत पोहचविण्याचे करावे.

विभाग प्रमुख
फळशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

<u>दर पत्रका विषयी नियम व अटी शर्ती</u>

१. दर पत्रके बंद लीपाफ्या मध्ये वरील कामाच्या विवरण नुसार सादर करावीत.
२. लीपाप्यावर अगदी वरच्या बाजूस स्पष्ट अक्षरात **'दर पत्रक- रोपवाटिका/ प्रक्षेत्रा मधील विविध कामे बाह्यस्त्रोतातून करार पद्धतीने करणे बाबत '** असे नमूद करावे.
३. दर पत्रका मध्ये या कार्यालयाचा संदर्भ पत्र क्र.वि.प्र./फ.शा./ कंत्राटीकामे/ २१४/२०२४ दि. १४/०६/२०२४ नमूद करावे.
४. देयक सादर करतांना जी.एस.टी. संबंधी त्रुटी निर्माण झाल्यास, शासन निर्णय जुलै २०१७ मधील नियम व अटीची पूर्तता करण्याची जबाबदारी हि संबंधित ठेकेदाराची असले.
५. अडीच लाख वरील अंतिम देयका मधुन एकूण रकमेच्या २ % जि.एस.टी. आणि १ % टी.डी.एस. कपात करण्यात येईल व त्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.
६. समान दरपत्रके व दर आढळून आल्यास अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता यांचे असतील.

७. कोणतेही दर पत्रक पूर्णता अथवा अंशतः स्विकारणे किंवा आलेले सर्व दर पत्रके नाकारणे याचे अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता तसेच गठीत समिती चे राहतील.

८. समाधानकारक काम पूर्ण झाल्या नंतरच पूर्ण देयक अदा केल्या जाईल

९. काम अपूर्ण अवस्थेत सोडून दिल्यास कामाचा मोबदला दिल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१०. सदरचे काम हे ठराविक कालावधीत पूर्ण करणे बंदनकारक असेल.

११. काम करणाऱ्या मजुरांचा सामुहिक विम्याची (Group Insurance) ई. ची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची असेल व कुठल्याही प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती अथवा शारीरिक हानी उदा. वीज पडणे, साप चावणे, झाडावरून पडणे व शेतीस अनसरून ईतर ईजा ई. बाबत हे कार्यालय कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

१२. समान दरपत्रके व दर आठळून आल्यास या पूर्वी केलेल्या काम आणि अनुभव यांना प्राधान्य देण्यात येईल व या बाबतचे सर्व अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता यांचे असतील.

१३. कोणतीही निविदा पूर्ण पणे अंशतः स्वीकारणे किंवा आलेल्या सर्व दर पत्रके नाकारणे याचे अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता तसेच गठीत समितीचे यांचे असतील.

१४. संबंधित ठेकेदाराने कामाचे दर हे किती दिवसा करिता वैध आहेत हे दर पत्रकात स्पष्ट नमूद करावे अन्यथा सदरचे दर हे १८० दिवस करिता अथवा ३१ मार्च २०२५ पर्यंत ग्राह्य धरण्यात येतील.

१५. काही तांत्रिक अथवा कार्यालयीन कारणास्तव देयेक अदा करण्यास उशीर झाल्यास संबंधित ठेकेदारास मजुरांचे देयक अदा करण्याची स्वतः जबाबदारी राहील.

१६. दर पत्रक मंजूर करणे अथवा काम समाधानकारक न केल्यास सदर करार रद्द करणे या बाबत चे सर्व हक्क समितीने स्वतः कडे राखून ठेवले आहेत.

१७. संबंधित ठेकेदाराने वरील नियम व अटी शर्ती मान्य असल्या बाबत दर पत्रकावर स्वतंत्रपणे अथवा वेगळे प्रमाणपत्र सही, नाव व पूर्ण पत्त्या सह दर पत्रक सोबत सादर करावे अथवा दरपत्रका मध्ये वेगळे नमूद करणे आवश्यक आहे.

१८. या दरप्रक्रीये अथवा कामाच्या बाबतीत काही न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास अकोला न्यायालयात चालेल.

विभाग प्रमुख
फळशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला